# MITHI RIVER DEVELOPMENT AND PROTECTION AUTHORITY (MRDPA)



# Compendium of Authority Meeting

# MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY

# SEPARATOR

Minutes of 4th Authority Meeting

# मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक : २० एप्रिल, २००७ (शुक्रवार)

वेळ : सकाळी ११. ३० वाजता

सभास्थान : मुख्यमंत्र्याचे समिती कक्ष

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. विलासराव देशमुख<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. आर. आर. पाटील<br>उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३) | मा. सौ. शुभा राऊळ<br>महापौर (मुंबई ) | सदस्य |
| ४) | मा. श्री. एकनाथ गायकवाड<br>खासदार महोदय | सदस्य |
| ५) | मा. श्री. नवाब मलिक<br>आमदार महोदय | सदस्य |
| ६) | मा. श्री. जनार्दन चांदुरकर<br>आमदार महोदय | सदस्य |
| ७) | मा. श्री. मोहम्मद (आरिफ) नसीम खान<br>आमदार महोदय | सदस्य |

निमंत्रित

१) श्री. देवशिष चक्रवर्ती
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

२) श्री. श्रीकांत सिंह
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

३) डॉ. दिलिप बोराळकर
सदस्य सचिव - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण केंद्र

४) प्रा. एस. के. गुप्ता
आय. आय. टी. बॉम्बे

५) श्री. के. एस. राव
मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्राधिकरण

६) मा. श्रीमती शिवानी ढगे
वरिष्ठ सहाय्यक संचालक
राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था

७) प्रा. आर. नागराजन
आय. आय. टी. बॉम्बे

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाचे अध्यक्ष व मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे तसेच सर्व उपस्थित सदस्यांचे डॉ. विकास तोंडवळकर, प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, प्राधिकरण यांनी चौथ्या बैठकीच्या निमित्ताने स्वागत केले.

बैठकीच्या विषयपत्रिकेत नमूद केलेल्या बाबी प्राधिकरणाच्या विचारार्थ पटलावर ठेवण्यात आल्या.

बाब क्र. १

डॉ. तोंडवळकर - सदस्य सचिव यांनी मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या तिस-या बैठकीचे इतिवृत्त सभेत वाचून दाखविले. ते तसेच्या तसे सर्व समंतीने प्राधिकरणाने मंजूर केले.

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या तिस-या सभेत घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यपूर्ती अहवालावर चर्चा करण्यात आली. त्या संदर्भात मा. आ. नवाब मलिक यांनी असे निदर्शनास आणले की, मिठी नदीच्या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पग्रस्त गाळेधारकांचे पुनर्वसन मुं. म. प्र. वि. प्रा. कडून अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही. महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांनी असे आश्वासित केले की, शासनाकडून यु.एल.सी. च्या जाग ताब्यात घेवून सदर प्रकल्पग्रस्त गाळेधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल. मा. अध्यक्ष यानीं मा. आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांना यावर त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत पुढील विषय पटावर घेण्यात आलेत :-

मागील बैठकीत ठरविण्यात आल्यानुसार व्यवहार्य मिठी नदी विकास आराखडयाचा मसुदा प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीकरीता मांडण्यात आला. या

संदर्भात प्रतिपादन करतांना प्रकल्प संचालक यांनी नमूद केले की, या बाबतीत नियमानुसार बातमीपत्रात जाहीरात देवून संबंधित प्रकल्पग्रस्तांकडून तसेच जनतेकडून सुचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेल्या सूचना व हरकती यांची सुनावणी तज्ञ समितीद्वारे घेण्यात आली व त्यानुसार तज्ञ समितीने योग्य तो सारासार विचार करुन मिठी नदी विकास क्षेत्राचा मसूदा आराखडा प्रस्तावित केला. सदर आराखडा प्राधिकरणाच्या मंजूरीकरीता सभसमोर ठेवण्यात आला.

या संदर्भात चर्चा करतांना मा. आमदार श्री. नवाब मलिक, यांनी सदर विकास आराखडा व्यवहार्य असल्याबद्दल आपली सहमती दाखविली. तसेच मिठी नदीचा विकास करतांना अगोदर नदीवरील पूलाचे रुंदीकरण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

यावर चर्चा करताना मुंबई महानगरपालिका आयुक्त, श्री. जॉनी जोसेफ यांनी चितळे कमीटीच्या सुचनेवर विचार करुन मिठी नदीच्या पात्राचे रुंदीकरण केले असल्याचे सांगितले. सी.डब्ल्यू.पी.आर.एसच्या शिफारशी प्रमाणे करावयाच्या रुंदीकरणामध्ये ब-याच अडचणी आहेत असे त्यांनी सांगितले. सदर रुदीकरण करण्याकरिता काही ठिकाणी अधिकृत औदयोगिक / निवासी इमारतीचे स्थलांतर करावे लागेल असे सांगितले. त्यामुळे पुढे रुंदीकरण करणे आवश्यक नसल्याचे सांगितले. त्यावर मा. आमदार, नसीम खान यांनी असे निदर्शनास आणले की, मिठी नदीच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यामध्ये काही ठिकाणी अजूनही चितळे कमिटीच्या शिफारशींप्रमाणे रुंदीकरणाचे काम झालेले नाही. यावर महापालिका

आयुक्त यांनी असे आश्वासन दिले की, जेथे चितळे कमिटीच्या शिफारशींप्रमाणे रुदींकरण झालेले नाही तेथे दुस-या टप्प्यामध्ये ते काम करण्यात येईल व सी.एस.टी. पुल ते विमान प्राधिकरण क्षेत्रातील पुल या भागात जेथे मोकळी जागा असेल तेथे जास्तीतजास्त रुंदीकरण करण्यात येईल. विमान प्राधिकरण क्षेत्रातील पुल ते एम. व्ही. रोडपर्यंत अधिकृत बांधकामांना बाधा न आणता शक्यतोवर जास्तीतजास्त रुंदीकरण करण्यात येईल. मा. मुख्यमंत्र्यांनी अधिकृत औद्यागिक निवासी बांधकामांना बांधा न आणता व्यवहार्य विकास आराखडयानुसारच मिठी नदीच्या पात्राचे रुंदीकरण करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे नमूद केले.

महापालिका आयुक्त, श्री. जॉनी जोसेफ यांनी असे लक्षात आणून दिले की, मिराणी समितीने सूचविल्याप्रमाणे माहिम कॉजवे येथे स्लुइज गेट बसवून पंपीग करण्याची आवश्यकता आहे, जेणेकरुन कुर्ला-कलिना पुल येथे पाण्याची पातळी ४ मीटर जी.टी.एस. ला ठेवून भरतीच्या वेळी पुरपरिस्थिती नियंत्रित ठेवता येईल. यावर महानगर आयुक्त, डॉ. टी. चंद्रशेखर यांनी असे निर्दशनास आणले आहे की, सी.डब्ल्यू.पी.आर.एसने स्लुइज गेटची शिफारस केलेली नाही कारण त्याची उपयुक्तता मोठयाप्रमाणात पाऊस पडल्यास मर्यादित प्रमाणात राहील. तसेच निरीने सुध्दा स्लुइज गेट उभारण्याबाबत अशाच प्रकारचे मत व्यक्त केले आहे. श्री. कपिल गुप्ता आय. आय.टी. बॉम्बे यांनी असे सांगितले की, माहिम कॉजवे येथे स्ल्युस गेट बसवून पंपींग केल्यास पूर नियंत्रण करणे शक्य होईल. यावर महापालिका आयुक्तांनी असे सागितले की, मिठी नदीच्या

बाबतीत वेगवेगळया तज्ञांचे वेगवेगळे मत असल्यामुळे या मिठी नदीच्या विकास करावयाच्या कामाकरीता एक तज्ञांची तांत्रिक समिती करणे आवश्यक आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प संचालकांना असे आदेश दिले की, मिठी नदी विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत ' तांत्रिक तज्ञांची कमिटी' नेमून याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

प्रस्तावित व्यवहार्य मिठी नदी विकास आराखडयात दाखविलेली मिठी नदी क्षेत्राची सिमारेखा ही तंतोतंत नसल्यामुळे मिठी नदीच्या अंतिम आराखडयाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सिंमाकन करणे आवश्यक आहे असे मा. आमदार, श्री. नसीम खान यांनी सुचविले. यावर चर्चा होवून प्रस्तावित व्यवहार्य मिठी नदी विकास आराखडयात दाखविलेली मिठी नदी क्षेत्राची सिमारेखा ही तंतोतंत नसल्यामुळे क्षेत्रीय आवश्यकतेनुसार त्यात व्यवहार्य बदल प्राधिकरणाच्या धोरणानुसार करण्याचे अधिकार तसेच या बाबतीत तांत्रिक सल्ला घेण्याकरीता योग्य त्या तज्ञ संस्थेकडून विचारणा करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक, मि. न. वि. प्रा. यांना देण्याचे ठरविण्यात आले.

यावर योग्य तो विचार होवून खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थपना करण्याबाबतच्या १९ ऑगस्ट, २००५ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या अधिकारानुसार असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, यापुढे मुं.म.प्र.वि.प्रा., मुंबई महानगरपालिका, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानपत्तन प्राधिकरण, जिल्हाधिकारी,

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व इतर संबंधित संस्था यांनी मिठी नदी विकास प्रकल्प राबवितांना मिठी नदी प्राधिकरणाची पूर्वानुमती घेवून त्याचे विकास विषयक प्रकल्प राबवावेत, तसेच मिठी नदी विकास क्षेत्राची सिमारेषा आरेखन मंजूरी प्रकल्प संचालक मिठी नदी प्राधिकरण यांचेकडून घेवूनच मिठी नदीचे रुंदीकरण करण्यात यावे. प्रकल्प संचालक मिठी नदी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे की, त्यांनी मंजूरीत मिठी नदी विकास आराखडयाचे सिमांकन जागेवर जावून, त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या वैधानिक बांधकामाचा विचार करुन योग्य तो क्षेत्रीय बदल करावा. हे करतांना त्यांनी सी.डब्ल्यू.पी.आर.एस. तसेच आय.आय.टी, चितळे कमिटी किंवा इतर तज्ञ संस्थांचा सल्ला आवश्यक असल्यास घ्यावा.

वरील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला व मा. अध्यक्षांचे व सर्व मा. सभासदांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपविण्यात आले.

मा. आमदार सदस्य व इतर सदस्य यांनी विशेष बाब म्हणून मिठी नदीच्या पात्रात होत असलेल्या अनधिकृत भरणी बद्दल योग्य ती कारवाई करण्याबाबत मा. अध्यक्षांना विनंती केली. मा. आमदार श्री. नवाब मलिक, यांनी असे निर्दशनास आणले की, काही ठिकाणी मिठी नदीच्या काठावर अनधिकृतपणे भराव टाकला जात आहे व यावर नियंत्रण राखणे आवश्यक आहे. मा. आमदार श्री. नसीम खान यांनी काही फोटो मिळवून मिठी नदीत टाकण्यात येत असलेल्या कच-यासंबंधी माहिती दिली आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी असे निर्देश दिले की. महानगरपालिकेच्या विभाग अधिका-यांने यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे

आवश्यक आहे. अन्यथा, त्या विभाग अधिका-यावर कारवाई करावी. तसेच मिठी नदीच्या काठावर सुरक्षा यंत्रणा ठेवण्यात यावी जेणेकरुन अशा गैर प्रकरांना आळा बसेल. तसेच ज्या इमारतीच्या तळघरात खोदकाम चालू असून खोदकाम केलेली माती कोठे जाते यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तसेच कोणताही विकासक अनधिकृतरित्या भराव करीत असेल तर त्यावर त्वरित कारवाई करुन त्या विकासाचे काम त्वरित थांबविणे आवश्यक आहे असे मा. आमदार श्री. नवाब मलिक यांनी सुचविले. यावर मा. अध्यक्षांनी अशाप्रकारच्या अनधिकृत भरणी होत असलेल्या जागेवर जावून त्यास जबाबदार असलेल्या संस्थांवर / अधिका-यांवर / कंत्राटदारांवर योग्य ती कारवाई करण्याबाबतचे निर्देश प्रकल्प संचालकांना दिले.

मा. आमदार नसीम खान यांनी निर्दशनास आणले आहे की विमानतळ प्राधिकरणामध्ये असलेल्या जुना पुल हे २७ मीटर रुद आहे व नविन पुल ४० मीटर रुंद आहे. त्यामुळे विमानतळ प्राधिकरणामध्ये नदीची रुदी वाढविणे आवश्यक आहे. त्यावर श्री. राव, सल्लागार विमानतळ प्राधिकरण यांनी सांगितले आहे की, सी.डब्ल्यू.पी.आर.एस. या संस्थेने सुचविल्याप्रमाणे मुंबई आंतरराष्टीय विमान पत्तन प्राधिकरण अतिरिक्त रुंदीचा मिठी नदी प्रवाह नव्याने बांधण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याबाबतचा अभ्यास आय.आय.टी. मुंबई या संस्थेद्वारे करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यकता भासल्यास मुंबई आंतरराष्टीय विमान पत्तन प्राधिकरण त्यांच्या ताब्यातील जागा देण्यास तयार

आहे व अधिकतम जागेची आवश्यकता भासल्यास शासनाने तशी व्यवस्था करुन दयावी, अशी विनंती केली आहे.

मा. आमदार श्री. नवाब मलिक यानी सांगितले की प्राधिकरणाच्या सदस्यांना नदीच्या प्रस्तावित रुंदीचा अंतिम नकाशा देण्यात यावा जेणेकरुन त्यांना जनतेला माहिती देण्यात येईल. मा. मुख्यंमत्र्यांनी लवकरात लवकर नकाशा देण्याचे आदेश प्रकल्प संचालकांना दिले.

चर्चे दरम्यान प्रकल्प संचालक, मि. न. वि. प्रा. यांनी त्यांना वरील प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर देखरेख, अधिदर्शन व प्रकल्पाच्या प्रगतीवर अंमलबजावणी करण्याकरीता योग्य तो तांत्रिक अधिकारी व इतर संबंधित कर्मचारी वर्ग त्यांना पुरविण्यात न आल्यामुळे त्यांच्या कामात अवाजवी तोशिष निर्माण झाल्याचे प्रतिपादन केले व यावर वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा वरील प्रमाणे आवश्यक तांत्रिक अधिकारी / कर्मचारी पुरविण्यात आलेला नाही, यावर खेद व्यक्त केला. यावर उपाययोजना म्हणून नगर विकास विभागाने त्वरीत कार्यवाही करुन मुं.म.प्र.वि.प्रा. / मुंबई महानगरपालि मधील कार्यरत योग्य तांत्रिक अधिकारी / कर्मचारी प्रकल्प संचालक, मि. न. वि. व सं. प्रा. यांच्या नामनिर्देशानुसार उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश जारी करावेत असे ठरविण्यात आले.

## 4th Meeting of Mithi River Development and Protection Authority

**Item No. 2: Finalisation of feasible alignment of Mithi river development zone**

Mithi river development zone comprises of widening of Mithi river as per the recommendations of CWPRS and buffer zone on either side of the bank as recommended by IIT, Bombay. Based on the recommendations of CWPRS, Khadakwasala, the IIT Bombay had prepared Mithi River Development Zone Plan delineating alignments for widening on either side of the river following the natural course of the river. The said development Plan was placed before the MRDP Authority in its meeting held on October 26.2006. During the discussions Municipal Commissioner, MCGM and the Metropolitan Commissioner, MMRDA expressed the concern regarding the constraints likely to be posed during the implementation of the said plan such as authorized structures, existing DP roads, water supply pipelines along the alignment, presence of mangroves within BKC, etc. After considering these constraints Chairman of the Authority had directed to prepare feasible Mithi River Development Zone Plan after inviting the suggestions and objections from the public and affected community by giving Press note. The MRDPA in the same meeting had also directed the Empowerment Committee to conduct its meeting and finalize the feasible Mithi river development zone plan.

Accordingly, the suggestions and objections from individuals affected by the area covered under widening of river on either side and buffer zone/additional buffer zone as well as from general public were invited on the proposals of widening recommended by C.W.P.R.S. and on buffer zone as recommended by IIT, Bombay. For obtaining the said suggestions and objections a 30 days public notice was given in English in Free Press Journal newspaper and in Marathi in Navashakti newspaper on October 19, 2006 indicating that the suggestions and objections would be received within 30 days from the date of publishing the notice. The suggestions and objections from the 84 affected individual/groups and general public were received.

The Committee comprising following members was constituted for hearing of suggestions / objections received on the proposal of Mithi river alignment and buffer Zone along Mithi River and to give recommendations regarding feasible widening which could be required to mitigate the floods in case of heavy rainfall.

1) Dr Vikas Tondwalkar
Project Director and Member Secretary
MRDPA.
Mumbai 400 051

2) Dr Rakesh Kumar,
Head, Mumbai Zonal Laboratory,
National Environmental Engineering Research Institute,
Worli,
Mumbai – 400 025

3) Mr N. V. Kulkarni,
Ex-Deputy Director (TP)
3, Indu Kiran Apartment,
12/941, Ideal Colony,
Kothrud,
Pune - 411 038

4) Martina Sapkal
Legal Expert
Bombay Mutual Chamber,
4th floor, 19/21' Ambalal Doshi Marg,
Mumbai - 400 001

The Committee considered the following before recommending the feasible alignment of Mithi river and Vakola nalla:

i) The recommendations of Interim report of CWPRS, Khadakwasala (2006) and IIT, Bombay (2006) as well as suggestions of NEERI, Nagpur while apprasing the proposal of Government of Maharashtra under JNNURM.

ii) Enhancing the flood mitigation potential of Mithi river and Vakola Nalla.

iii) Original course of the Mithi river and Vakola Nalla are not disturbed to the extent possible.

iv) Suggestions and objections received from the affected individual/groups/public.

## 4th Meeting of Mithi River Development and Protection Authority

**Item No. 3 : Review of the Progress of Works to be undertaken in Phase II by MMRDA and MCGM.**

**MCGM Works -**

MCGM has proposed to undertake the following works in Phase II :

- To widen and deepen the Mithi River having a length of 11.5 km in MCGM's jurisdiction. (from CST bridge to Saphed pool Nalla as per CWPRS recommendations and remaining as per the feasible width.)
- To construct the R.C.C. retaining wall on both banks of the river.
- To construct 12 m wide service roads on both the banks of the river (except Airport Authority compound wall).

Tender notice was published on 2-11-2006. The toal estimated cost Rs.182 Crores. The tenders have been submitted on 14-11-2006. The Tender evaluation has been completed. The work order to the Contractors will be issued soon. The target date of completion of the works is 31-05-2008. Preparing the Tender for Remodeling of Bridges at Kalina Road and Kranti Nagar. The Tender for widening and deepening of Vakola Nalla within the stretch of MCGM have been finalized. The desilting works have been commenced in the first week of April, 2007.

**MMRDA Works -**

MMRDA has proposed to undertake the following works in Phase II :

- To widen and deepen the Mithi River having a length of 6 km and Vakola Nall havng length of 2.5 km in MMRDA's jurisdiction.
- To construct the R.C.C. retaining wall on both banks of the Mithi River and to construct R.C.C. diaphragm wall on both banks of Vakola Nalla.
- To construct 20 m wide service roads on both the banks of the river and Vakala Nalla.
- To excavate/remove 2,00,000 cum.m. rocky outcrop at sea ward side of Mahim causeway.

Tender Notice was published on 9-12-2006. The total estimated cost Rs.272 Crores. The Tenders were supposed to be received on January 23, 2007. However, on the request of bidders the date was extended to February 6, 2007 and have been finalized in March, 2007. The desilting works have been commenced by MMRDA in the first week of April, 2007.